# मिरा भाईदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ०९/०८/२०१९ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

| | |
|---|---|
| १५. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. ०६/१२/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न. | |
| १) किती व कोणते लॉजिंग बोर्डींग आहेत? | सदरची माहिती प्रभाग समिती कार्यालय क्र. १ ते ६ यांच्या कार्यालयात उपलबध आहेत. प्रभाग समिती क्र. २ ची माहिती निरंक आहे. |
| अ) कोणत्या व कधी लॉजिंग बोर्डींगनी परवाने घेतलेले आहेत व त्यांचे नुतनीकरण केलेले आहे? | सोबत यादी जोडली आहे. |
| ब) किती व कोणते लॉजिंग बोर्डींग अनधिकृत आहेत? | सदरची माहिती प्रभाग समिती कार्यालय क्र. १ ते ६ यांच्या कार्यालयात उपलबध आहेत. प्रभाग समिती क्र. २ ची माहिती निरंक आहे. |
| क) कोणत्या अनधिकृत लॉजिंग बोर्डींगवर कोणती कारवाई करण्यात आली? | जा.क्र.मनपा/आ.प./३४७/२००८-०९ अन्वये दि. १८/०२/२००९ रोजी २३ लॉजिंग-बोर्डींगचे परवाने रद्द केले. |
| ड) कोणत्या अनधिकृत लॉजिंग बोर्डींगवर MRTP अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले? | निरंक |
| इ) एप्रिल २००८ नंतर किती अनधिकृत लॉजिंग बोर्डींगला परवाने देण्यात आले? | ७४ |
| १६. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. १०/१२/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न. | |
| १) आरक्षण क्र. २१४ (बगीचा) एकूण क्षेत्रफळ किती? | आरक्षण क्र. 214 (बगीचा) चे एकूण क्षेत्रफळ 10500 चौ.मी. आहे. |
| अ) या आरक्षणाच्या अनुषंगाने मा. महासभा प्र.३३ पारित झालेल्या ठरावाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली? | सदरील आरक्षण समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकसीत करणेकामी प्रस्ताव दाखल झाला असून सदरील प्रस्ताव अद्याप छाननी स्तरावर आहे. |
| ब) या आरक्षणाचे एकूण क्षेत्रफळ मनपाच्या ताब्यात आले आहे? | सदर आरक्षणाचे 1478.25 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. |
| क) या ताब्यात आलेल्या आरक्षणाच्या बदल्यात कोणाला किती, कधी, विकास हक्क प्रमाणपत्र देण्यात आले? | सोबत यादी जोडली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ड) या एकूण आरक्षणाचे अधिकार पत्र धारक कोण आहेत? | | आरक्षण क्र. 214 (बगीचा) मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील 1478.25 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेचे असून उर्वरित क्षेत्र खाजगी मालकीचे आहे. |
| इ) हे आरक्षण समावेशक आरक्षणाखाली विकसित करण्याबाबत मनपाने अजून पर्यंत कोणती कार्यवाही केली? | | सदरील आरक्षण समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकसीत करणेकामी प्रस्ताव दाखल झाला असून सदरील प्रस्ताव अद्याप छाननी स्तरावर आहे. |
| १७. श्रीम. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. ०८/०२/२०१९ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि. ०५/०७/२०१६ मधील प्रकरण क्र. ३२ मधील सुचना - पुतळे उभारण्याबाबत ठराव पास झाला त्यामध्ये मराठी मनातील ४ थोर महान पुरुष व माता (१) जिजा माता - मिरारोड स्टेशन बाहेर, (२) लोकमान्य टिळक - मॅक्सस मॉल चौकी जवळ (३) सावित्रीबाई फुले - नवघर मैदान (४) वि. वा. सावरकर - सावरकर चौक गोल्डन नेस्ट येथे पुतळे उभारणे या संदर्भात पुढील कार्यवाही काय केली व करणार? | | मा. महासभेच्या मान्यतेनंतर निविदा प्रक्रिया करुन पुतळ्यासाठी चबुतरा बांधण्याची कामे मंजूर करण्यात येऊन शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पुतळा-3116/प्रक्र.308/29, दि. 2 मे 2017 अन्वये पोलीस विभागाकडे नाहरकत दाखला देण्यासाठी कळवून पाठपुरावा करण्यात येत आहे.<br>पुतळा उभारणाऱ्या संस्थांची नेमणूक करुन कले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. तद्नंतर मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांना प्रस्ताव पाठवून रेखाचित्राबाबत मान्यता घ्यावयाची आहे. तसेच नगरविकास विभाग, मंत्रालय यांची मान्यता घेवून मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समिती समोर प्रस्ताव ठेऊन त्यांच्या मान्यतेने प्रत्यक्षात पुतळा बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. |
| १८. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. २४/०७/२०१९ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) शहरामध्ये किती गॅरेजेस आहेत? | | --- |
| A) शहरामध्ये किती कार वॉशिंग सेंटर आहेत? | | --- |
| B) शहरामध्ये किती सर्विस सेंटर आहेत? | | --- |
| C) शहरामध्ये किती वाहन शोरुम आहेत? | | --- |
| D) शहरामध्ये किती स्पेअर्स विक्रेते आहेत? | | --- |
| E) वरील पैकी किती जणांनी मनपाचा परवाना घेतलेला आहे? | | --- |
| F) वरील व्यवसायासाठी प्रती परवाना १००००.०० प्रमाणे किती परवाना फी मनपाकडे जमा झालेली आहे? | | --- |
| G) किती व्यवसाय मनपा आरक्षण जागेत आहेत? | | --- |
| H) किती व कोणत्या प्रभाग अधिकाऱ्यांनी कोणाला तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दि. | | --- |

| | | |
|---|---|---|
| I) १५ दिवसात परवानगी न घेतलेल्या कोणत्या आस्थापनांना फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. ? | | --- |
| J) सदर व्यवसाय करणाऱ्यांनी मनपाचे रस्ते, पदपथ व इतर मोकळ्या जागेत वाहने उभी करुन मनपाला किती दंडाची रक्कम जमा केली? | | --- |
| K) प्रशासनाने सदर ठरावाची अंमलबजावणी केलेला सविस्तर अहवाल काय आहे? | | --- |

(डॉ. सुनिल लहाने)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका